24-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 23-05-2025 21:13 Page 1



## निवडक



### युएईचा टी-२० मालिकेत शानदार विजय

**नवी दिल्ली, दि. २३** : शारजाह येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात युएईने बांगलादेशचा ७ विकेट्सने पराभव केला आणि टी-२० मालिका जिंकली. अलिशान शरफूच्या दबावाखाली नाबाद ६८ धावा आणि हैदर अलीच्या शानदार गोलंदाजीमुळे यूएईने १६३ धावांचे लक्ष्य गाठले. कसोटी खेळणाऱ्या संघाविरुद्ध यूएईचा हा दुसरा टी-२० मालिका विजय आहे. यापूर्वी २०२१ मध्ये त्यांनी आयर्लंडला याच फरकाने पराभूत केले होते.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेश संघाला एकेकाळी ८ बाद ८४ अशी झगडावे लागत होते, परंतु शेवटच्या षटकांत त्यांनी पुनरागमन करत ९ बाद १६२ अशी मजल मारली. युएईने ३ विकेटच्या मोबदल्यात १६३ धावा करून लक्ष्य गाठले. अलिशान शरफूने ४७ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ६८ धावा केल्या.

बांगलादेशची सुरुवात खराब झाली कारण पहिल्या सामन्यात शतक झळकावणारा परवेझ हुसेन इमॉन खाते न उघडताच बाद झाला. कर्णधार लिटन दासने १४ धावांची खेळी केली, तर तौहीद हृदयॉयलाही एकही धाव करता आली नाही.

जेव्हा मेहेदी हसन दोन धावा काढून बाद झाला तेव्हा संघाची धावसंख्या ४ बाद ४९ धावा झाली. यानंतर, सलामीवीर तन्जीद हसन १८ चेंडूत ४० धावांची खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला. बांगलादेशचा अर्धा डाव ५७ धावांवर संपला.

यानंतरही विकेट पडण्याचा क्रम सुरूच राहिला. झाकीर अलीने एका टोकाकडून ४१ धावांची खेळी केली, पण त्याला इतर कोणाकडूनही साथ मिळाली नाही. बांगलादेशने ८४ धावांत ८ विकेट गमावल्या होत्या. जॅकरने संघाला १०० धावांच्या पुढे नेले. झाकीर अली १२८ धावांवर बाद झाला. त्यानंतर हसन महमूद आणि शरिफुल इस्लाम यांनी शेवटच्या विकेटसाठी नाबाद ३२ धावांची भागीदारी केली. दोघांनीही फक्त १० चेंडूत या धावा केल्या आणि संघाला १६२ धावांपर्यंत पोहोचवले. हैदर अलीने ४ षटकांत ७ धावा देत ३ बळी घेतले. सगीर खानने दोन गडी बाद केले.

### अँजेलो मॅथ्यूजची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती



**डब्ल्यूटीसी अंतिम सामन्यापूर्वी घेतला मोठा निर्णय!**

**नवी दिल्ली, दि. २३** : श्रीलंकेचा स्टार खेळाडू अँजेलो मॅथ्यूजने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने अधिकृतपणे कसोटी क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ३८ वर्षीय अँजेलो मॅथ्यूजने २००८ मध्ये पहिल्यांदाच श्रीलंकेचे प्रतिनिधित्व केले होते. मॅथ्यूज २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात श्रीलंकेचे प्रतिनिधित्व करतानाही दिसला होता. तथापि, त्याच्या उपस्थितीत संघ उपांत्य फेरीत पोहोचू शकला नाही. तथापि, आता या स्टार अष्टपैलू खेळाडूने स्वतःला कसोटी क्रिकेटपासून दूर केले आहे. तो सुमारे १७ वर्षे श्रीलंकेसाठी कसोटी खेळला.

कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर अँजेलो मॅथ्यूजने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आणि लिहिले, माझ्या प्रिय मित्रांनो आणि कुटुंबियांनो, कृतज्ञ मनाने. आता खेळाच्या सर्वात प्रिय स्वरूपाला, आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटला निरोप देण्याची वेळ आली आहे. गेल्या १७ वर्षांपासून श्रीलंकेसाठी क्रिकेट खेळणे हा माझा सर्वात मोठा सन्मान आणि अभिमान आहे. जेव्हा एखादी व्यक्ती राष्ट्रीय जर्सी घालते तेव्हा देशभक्ती आणि सेवेच्या भावनेपेक्षा जास्त काहीही असू शकत नाही. मी खेळाचा आणि माझ्या कारकिर्दीतील सर्व चढ-उतारांमध्ये माझ्या पाठीशी उभे राहिलेल्या हजारो श्रीलंकेच्या क्रिकेट चाहत्यांचा आभारी आहे.

तो पुढे म्हणाला की, मी सर्वशक्तिमान देवाचे, माझ्या प्रेमळ पालकांचे, माझ्या सुंदर पत्नीचे आणि अद्भुत मुलांचे तसेच माझे कुटुंब आणि जवळच्या मित्रांचे आभार मानू इच्छितो ज्यांनी एकत्रितपणे नेहमीच माझ्यावर विश्वास ठेवला, मला पाठिंबा दिला आणि प्रत्येक परिस्थितीत माझ्या पाठीशी उभे राहिले. एक अध्याय संपला आहे, पण खेल के प्रति प्यार नेहमीच राहील. जूनमध्ये बांगलादेशविरुद्धचा पहिला कसोटी सामना हा माझ्या देशासाठी लाल चेंडूने खेळलेला माझा शेवटचा सामना असेल.

# पंतला अखेर विजयाची चव; गुजरातचा पराभव

**मुंबई, दि. २३ :**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या गुरुवारी झालेल्या महत्त्वपूर्ण सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने (एलएसजी) गुजरात टायटन्सवर मात करत कर्णधार ऋषभ पंतला या मोसमातील बहुप्रतीक्षित विजयाची चव चाखायला दिली . या पराभवामुळे गुजरात टायटन्सच्या टॉप-टूमध्ये पोहोचण्याच्या आशांवर पाणी फेरले असून, अंतिम फेरीत दोन संधी मिळवण्याची शक्यता धूसर झाली आहे.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात संघासाठी अजूनही क्वालिफायर १ मध्ये स्थान मिळवण्याचा मार्ग पूर्णतः बंद झालेला नसला, तरीही आता सर्व काही त्यांच्या हातात राहिलेले नाही. एलएसजीविरुद्धचा पराभव अधिकच निराशाजनक ठरला कारण लखनऊ संघ सध्या प्लेऑफ शर्यतीबाहेर आहे.

या पराभवानंतर सामन्यानंतरच्या

### गिलने पंतकडे दुर्लक्ष केल्याचा व्हिडिओ व्हायरल

पारंपरिक हस्तांदोलनावेळी गिलने पंतकडे दुर्लक्ष केल्याचे दृश्य व्हायरल झाले. हे पाहून चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आले आहे, कारण दोघेही भारतीय संघातील महत्त्वाचे खेळाडू असून, रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीनंतर या दोघांपैकी एकाला नेतृत्वाची धुरा मिळण्याची शक्यता आहे.

सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत गिलने पराभवाची कारणमीमांसा करताना सांगितले, आम्ही १५-२० धावा जास्त दिल्या. त्यांना २१० पर्यंत रोखणे आवश्यक होते. २१० आणि २३० धावांमध्ये मोठा फरक असतो. पॉवरप्लेमध्ये चांगली गोलंदाजी झाली, पण एकही विकेट मिळाली



नाही. पॉवरप्लेच्या नंतर १४ षटकांमध्ये त्यांनी १८० धावा केल्या, जे खूपच जास्त आहे.

त्याने पुढे रदरफोर्ड आणि शाहरुख खान यांच्या फलंदाजीचे कौतुक करत म्हटले की , २४० धावांचा पाठलाग कधीच सोपा नसतो, पण आम्ही १७ व्या षटकापर्यंत चांगल्या स्थितीत होतो. आता उर्वरित सामन्यांमध्ये विजय मिळवून गती परत मिळवणे महत्त्वाचे ठरेल.

दुसरीकडे, लखनऊचा कर्णधार ऋषभ पंत संघाच्या सर्वांगीण कामगिरीने अत्यंत समाधानी होता. त्याने सांगितले, निश्चितच खूप आनंदी आहे. संघाने दाखवून दिले की आम्ही अजूनही दर्जेदार क्रिकेट खेळू शकतो. जरी प्लेऑफची संधी निघून गेली असली, तरीही अशा कामगिरीतून आत्मविश्वास मिळतो.

पंतने शाहरुख खानच्या खेळीचे विशेष कौतुक केले. खालच्या फळीतील फलंदाजांकडून अशी खेळी अपेक्षित नसते, पण शाहरुखने आशा निर्माण केली. स्पर्धेदरम्यान आम्हाला दुखापतींचा त्रास झाला, पण मिचेल, मार्कराम, पूरन आणि इतर फलंदाजांनी जबाबदारीने खेळ केला. क्षेत्ररक्षणात काही चुका झाल्या, त्यातून शिकून पुढे जाणे गरजेचे आहे, असे पंतने स्पष्ट केले. या सामन्यामुळे गुणतालिकेवर लक्षणीय परिणाम झाला असून, गुजरातसाठी उर्वरित सामने 'करो अथवा मरो' स्थितीचे ठरत आहेत.

# एफ-वन दिग्गज मायकेल शूमाकर दशकभरानंतर बाहेर

### धर्मादाय हेल्मेटवर स्वाक्षरीने भावनिक क्षण

**नवी दिल्ली, दि. २३ :**

एफ -१ शर्यतींचा सात वेळचा विश्वविजेता मायकेल शूमाकर याने डिसेंबर २०१३ मधील भीषण स्कीइंग अपघातानंतर जवळपास एक दशक सार्वजनिक जीवनापासून दूर राहिल्यानंतर प्रथमच एक लक्षणीय कृती करत आपल्या चाहत्यांना आशेचा किरण दाखवला आहे. त्याच्या आरोग्याबद्दल आजवर अत्यंत गोपनीयता राखली जात असली, तरी नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार, त्याने एका विशेष धर्मादाय उपक्रमासाठी हेल्मेटवर स्वाक्षरी केली आहे.

युरोपियन प्रसारमाध्यमांतील वृत्तानुसार, गेल्या महिन्यात मायकेल शूमाकर याने पत्नी कोरिना यांच्या मदतीने एफ - १ दिग्गज जॅकी स्टीवर्ट यांच्या हेल्मेटवर स्वाक्षरी केली. हे हेल्मेट एक विशेष धर्मादाय लिलावासाठी वापरले जाणार असून त्यातून संकलित निधी एका दुर्धर आजारावरील संशोधनासाठी दिला जाणार आहे.

शूमाकर याने केलेली ही कृती त्याच्या प्रकृतीतील सुधारणा दर्शवते का, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही. मात्र, ही घटना चाहत्यांसाठी आणि मोटरस्पोर्ट्स विश्वासाठी एक अत्यंत भावनिक क्षण ठरली आहे.

एफ - वन क्षेत्रातील त्यांचे माजी सहकारी आणि १९९४-९५ मध्ये बेनेटन



संघात शूमाकरसोबत खेळलेले ड्रायव्हर जॉनी हर्बर्ट यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की , मायकेल शूमाकरने जॅकी स्टीवर्टच्या हेल्मेटवर स्वाक्षरी केली, ही गोष्ट केवळ आश्चर्यकारक नाही, तर अत्यंत भावनिक आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही असा क्षण पाहिला नव्हता. ही कृती भविष्यातील आशेचे चिन्ह ठरू शकते.

ते पुढे म्हणाले, मायकेलला पुन्हा एकदा एफ -वन पॅडॉकमध्ये पाहणे हा एक विशेष क्षण ठरेल. त्यांच्या आजवरच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, त्यांचे पुनरागमन संपूर्ण जगासाठी प्रेरणादायक ठरेल.

या प्रकल्पाशी संबंधित असलेले आणि स्वयं जॅकी स्टीवर्ट यांनी देखील मेल स्पोर्ट या माध्यमाशी बोलताना भावना व्यक्त केल्या. मायकेलने अशा एका दुर्धर आजाराच्या मदतीसाठी हेल्मेटवर स्वाक्षरी केली, ही गोष्ट विलक्षण आहे. कोरिनाने त्याला मदत केली आणि आता आमच्याकडे प्रत्येक चॅम्पियनची स्वाक्षरी असलेला पूर्ण सेट आहे, असे स्टीवर्ट म्हणाले. एफ -वन जगतातील हा क्षण केवळ एक सेलिब्रिटी घटना न राहता, एका महान खेळाडूच्या लढ्याची साक्ष ठरतो. शूमाकर यांचे हे लक्षणीय पाऊल भविष्यातील आणखी सकारात्मक संकेत देईल, अशी सर्वांची आशा आहे.



# जो रूट मोडणार तेंडुलकरचा विक्रम !

**नॉटिंगहॅम, दि. २३ :**

इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट याने गुरुवारी ट्रेंट ब्रिज येथे झिम्बाब्वेविरुद्ध खेळल्या गेलेल्या चार दिवसीय कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात ३४ धावा करत एक ऐतिहासिक टप्पा गाठला. या खेळीच्या जोरावर तो कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद १३,००० धावा पूर्ण करणारा खेळाडू ठरला आहे.

या सामन्यापूर्वी रूटच्या नावावर १५२ कसोटी सामन्यांत १२,९७२ धावा होत्या. त्यामुळे १३ हजारांच्या माइलस्टोनसाठी त्याला केवळ २८ धावांची गरज होती. रूटने ती अचूक पूर्ण करत नव्या विक्रमाची नोंद केली. इंग्लंडकडून कसोटी क्रिकेटमध्ये १३,००० धावा पूर्ण करणारा तो पहिला खेळाडू ठरला असून, आंतरराष्ट्रीय पातळीवर हा टप्पा गाठणारा तो केवळ पाचवा फलंदाज आहे.

या यादीत रूटसह क्रिकेटच्या इतिहासातील काही दिग्गज खेळाडूंची नावे आहेत - भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, ऑस्ट्रेलियाचा रिकी पॉन्टिंग, दक्षिण आफ्रिकेचा जॅक कॅलिस आणि भारताचाच राहुल द्रविड.

रूटने केवळ २७९ डावांत हा टप्पा पार करत सचिन तेंडुलकर यांच्याही पुढे झेप घेतली आहे. तेंडुलकरच्या तुलनेत रूटने ४७ कसोट्या कमी खेळल्या असून, तो सध्या त्याच्या १५,९२१ धावांच्या विक्रमापासून केवळ २,९१५ धावा दूर आहे. ३४ वर्षीय रूटच्या सध्याच्या फॉर्म आणि फिटनेसच्या पार्श्वभूमीवर, तो सचिनचा विक्रम मोडू शकेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या रूटने १५३ कसोट्यांत ३६ शतके झळकावली असून, कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतक करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत त्याचा पाचवा क्रमांक लागतो. इंग्लंडकडून सर्वाधिक कसोटी धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत माजी कर्णधार ॲलिस्टर कुक त्याच्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर आहेत. कुकच्या नावावर १६१ कसोट्यांत १२,४७२ धावा आहेत. याशिवाय, रिकी पॉन्टिंगच्या १३,३७८ धावांच्या विक्रमापासून रूट फक्त ३७२ धावा दूर आहे. पॉन्टिंगने १६८ कसोट्यांत ५१.८५ च्या सरासरीने धावा केल्या होत्या. रूटची सध्याची कामगिरी पाहता, तोही विक्रम लवकरच मोडला जाईल, अशी शक्यता आहे. यॉर्कशायरमध्ये जन्मलेला हा उजव्या हाताचा फलंदाज सातत्याने इंग्लंडसाठी धावांची भूक कायम ठेवत आहे. कसोटी क्रिकेटमधील त्याच्या या ऐतिहासिक कामगिरीने तो आता महान फलंदाजांच्या यादीत मानाचे स्थान पटकावून बसला आहे.

# शुभमन गिलने सांगितली यशाची गुरुकिल्ली!

**बंगळुरू, दि. २३ :**

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलने आपल्या संघाच्या फलंदाजीबाबत महत्वाचा खुलासा केला आहे. त्यांनी सांगितले की, विरोधी संघाला मागे टाकण्याचे कौशल्य हेच त्याच्या साथीदार साई सुदर्शन सोबतच्या भागीदारीला प्रभावी बनवते. गिल पुढे म्हणाला की , परिस्थितीचा अभ्यास करणे आणि योग्य वेळेवर रणनीती आखणे हेच आयपीएल २०२५ मध्ये आमच्या यशाचे मुख्य कारण आहे.

आयपीएल २०२५ मध्ये सलामी जोडी म्हणून सुदर्शन आणि गिल यांनी एकत्रितपणे ७६.२७ च्या सरासरीने ८३९ धावा केल्या आहेत, ज्यात सात अर्धशतके आणि तीन शतकांचा समावेश आहे. रविवारी अरुण जेटली स्टेडियमवर त्यांनी पहिल्या विकेटसाठी नाबाद २०५ धावांची भागीदारी करून टी-२० क्रिकेटमध्ये गुजरात टायटन्ससाठी सर्वाधिक भागीदारी केली. याच सामन्यात गुजरातने दिल्ली कॅपिटल्सवर १० विकेटने मात करत प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले.

गिलने जिओहॉटस्टारवरील 'जेन बोल्ड' या कार्यक्रमात सांगितले की, आमची फलंदाजीची पद्धत सारखी नसली तरी डाव्या आणि उजव्या हाताच्या फलंदाजांच्या



जोडीमुळे फायदे होतात. आम्ही विकेट दरम्यान चांगले धावतो आणि आम्हाला प्रतिस्पर्ध्याला, विशेषत: गोलंदाजांना मागे टाकणे आवडते.

टी-२० क्रिकेटमध्ये इम्पॅक्ट प्लेअर नियमामुळे या कौशल्यावर थोडा फरक पडला आहे, तरीही गुजरात टायटन्सची टीम परिस्थिती समजून सातत्याने धावसंख्या वाढवण्यात यशस्वी असल्याचेही त्याने सांगितले. चांगल्या परिस्थितीत स्विंग करणे सोपे असते, पण खरे कौशल्य म्हणजे परिस्थितीचे अचूक मूल्यांकन करून सातत्यपूर्ण लढाऊ फलंदाजी करणे, असे गिलने स्पष्ट केले.

संघाच्या सातत्यपूर्ण यशाबाबत विचारताच त्याने सर्व विभागांमधील सामूहिक कामगिरीचे श्रेय दिले. ही एक टीमची कामगिरी आहे. सर्व खेळाडू एकत्र येऊन योगदान देत आहेत, ज्यामुळे गेल्या तीन वर्षांत आम्ही चांगले प्रदर्शन केले आहे आणि ह्या हंगामातही ते सुरू आहे, असे तो म्हणाला .

कर्णधार शुभमन गिलने प्रशिक्षक आशिष नेहराला संघाची ओळख तयार करण्यातील महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचेही मानले. आशिष नेहरा प्रथमच संघाबरोबर आला तेव्हा त्याच्याकडे एक स्पष्ट दृष्टी होती की संघ कसा बांधायचा आणि खेळाडूंच्या भूमिका कशा ठरवायच्या. मैदानावर आणि बाहेर त्याचा खेळाडूंशी संवाद प्रभावी आहे, असे त्याने सांगितले.गोलंदाजी युनिटच्या कामगिरीबाबत गिल म्हणाला, नेहमी सुधारणा करता येते आणि आशिष नेहरा वैयक्तिकरित्या गोलंदाजांशी काम करतो, जे आमच्यासाठी मोठे बलस्थान आहे. अनेकांना वाटते की आयपीएल फलंदाजांनीच जिंकले आहे, पण आमची विचारसरणी वेगळी आहे. बचाव करता आला नाही तर किती धावा केल्या आहेत हे महत्त्वाचे नाही.

गेल्या वर्षी झिम्बाब्वे विरुद्ध दुसऱ्या टी-२० सामन्यात पहिलं आंतरराष्ट्रीय शतक झळकावल्यानंतर, अभिषेक शर्माने सांगितले की त्याने बालपणीच्या मित्र आणि १९ वर्षांखालील संघातील सहकारी शुभमन गिलची बॅट वापरली होती, जी तो नियमितपणे वापरत असतो.

गिलने याबाबत थोडकासा खुलासा करत सांगितले, हे आमच्या अंडर-१६ दिवसांपासून सुरू आहे. अभिषेक माझी बॅट वापरतो. तो माझ्या मॅच बॅटवर ८०-९० धावा करत असताना मला ती बॅट तुटू देऊ नयेत म्हणून मी त्याला परत करण्यास सांगितले, त्यावरून आम्हाला थोडं खटकेसुद्धा झाले! पण जेव्हा तो माझी बॅट मागायचा, तेव्हा मी नेहमीच दिली आणि त्याने त्या बॅटने चांगली फलंदाजी केली.

# नवोदित खेळाडू संधीचे सोने करतील : गौतम गंभीर

**नवी दिल्ली, दि. २३ :**

इंग्लंड दौर्यावर होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ सध्या तयारी करत असून, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याच्या नेतृत्वाखाली काही नवोदित खेळाडू सरावात सहभागी झाले आहेत. रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन यांसारखे अनुभवी खेळाडू या मालिकेसाठी संघात नसल्याने नव्या खेळाडूंना आपल्या क्षमतेची चुणूक दाखविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

गंभीरने मान्य केले की रोहित आणि कोहली यांची जागा घेणे हे आव्हानात्मक असेल. मात्र, नव्या पिढीतील खेळाडूंमध्ये सामर्थ्य असून ते पुढे येतील, असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

क्रिकेट नेक्स्ट या क्रीडा संकेतस्थळाशी बोलताना गंभीर म्हणाला की, आपल्याला दोन वरिष्ठ खेळाडूंशिवाय खेळावे लागेल. हे नक्कीच कठीण असेल. पण मला वाटते की ही इतर काही खेळाडूंना पुढे येऊन 'हो, मी तयार आहे' असे



म्हणण्याची संधी आहे. काही खेळाडू नक्कीच हात वर करतील आणि जबाबदारी स्वीकारतील.

भारताच्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमधील यशाचा उल्लेख करताना त्याने सांगितले की, त्या स्पर्धेत जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीतही भारताने विजेतेपद मिळवले होते. ज्यावेळी बुमरा नव्हता, त्यावेळी मी हेच म्हटले होते की, एखाद्या खेळाडूच्या अनुपस्थितीमुळे दुसऱ्याला देशासाठी काहीतरी खास करून दाखवायची संधी मिळते. मला आशा आहे की अन्य खेळाडू अशाच संधीची वाट पाहत असतील,असं त्याने स्पष्ट केले.

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या कसोटी क्रिकेटमधून माघार घेण्याच्या निर्णयावर भाष्य करताना गंभीरने स्पष्टपणे सांगितले की निवृत्ती हा प्रत्येक खेळाडूचा पूर्णतः वैयक्तिक निर्णय आहे. खेळ सुरू कधी करायचा आणि संपवायचा कधी, हा निर्णय खेळाडूच घेऊ शकतो. कोच असो, निवडसमिती असो, किंवा देशातील कोणताही व्यक्ती असो ; कोणालाही कोणाला निवृत्त व्हावं किंवा नाही हे सांगण्याचा अधिकार नाही. हा निर्णय अंतःप्रेरणेतून येतो, असे त्याने ठामपणे नमूद केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २६१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 261 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .